# नागरीकांची सनद

**कार्यालय**
**संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन**

---

महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ नुसार मंत्रालय स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यांत आला आहे. त्यानुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

यंत्रणेचे मुख्यालय संचालनालय म्हणून पुणे येथे असून त्यांचे अधिनिस्त कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ महसूल विभागात उपसंचालकांची विभागीय कार्यालये असून त्यांच्या नियंत्रणाखाली त्या महसूल विभागातील जिल्हे आहेत. या यंत्रणेची सर्व ३३ जिल्हयात जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालये कार्यरत आहेत.

शासन अधिसूचना दिनांक १४ नोव्हेंबर, २००० नुसार विंधण विहिर व वायु संपिडक सुरुंग कार्यक्रम जिल्हा परिषदेकडे वर्ग झाल्यामुळे अभियांत्रिकी कर्मचारीवृंद व यंत्र सामुग्री भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून राज्यातील सर्व जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यांत आली आहे. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील भूवैज्ञानिकांची ९९ पदे जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांत आली आहेत. शासनाकडील पदांच्या आढाव्यानुसार दिनांक ३० जून, २००३ पासून यंत्रणेच्या योजना राबविण्यासाठी एकूण गट-अ, ब, क व ड ची मिळून १३६५ पदे मंजूर आहेत.

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची कार्यकक्षा -

राज्यातील भूजल विषयक माहिती प्राप्त करुन त्याचा सूक्ष्म अभ्यास करुन, शेतक-यांना व जनतेला भूजल विषयक मार्गदर्शन करुन त्यांचे रहाणीमान उंचविणे, त्याचबरोबर पिण्याचे शुध्द पाणी शाश्वतपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सर्वेक्षण, स्थळनिश्चिती व आवश्यक उपाययोजनांची लोकसहभागातून अंमलबजावणी ही प्रमुख कामे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे आहेत. यामध्ये जिल्हयातील भूजलाची उपलब्धता, भूजलाची गुणवत्ता, जलवेधशाळेच्या माध्यमातून विविध परिमाणांची माहिती जिल्हयातील एकूण

भूजल पुनर्भरण, भूजल उपसा, शिल्लक भूजल व भूजल पातळी यांचा अभ्यास करुन पाणलोटांची वर्गवारी निश्चित करणे, अतिशोषित व शोषित पाणलोटांतील गांवे अधिसूचित व शिफारस करणे, जिल्हयातील भूस्तरांचे भूभौतिक गुणधर्म प्राप्त करणे व विश्लेषण करणे, पर्जन्यमान व भूजल पातळीचा तुलनात्मक अभ्यास करुन संभाव्य पाणी टंचाई सदृश्य परिस्थितीचा अहवाल तयार करणे, राज्यातील भूजल संपत्तीत वाढ होणेकरीता विविध पाणलोटक्षेत्र विकासाचे कार्यक्रमाला मार्गदर्शन करणे इत्यादी तांत्रिक माहितीचा समावेश आहे. याशिवाय जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणा-या विंधण कामाचे संनियंत्रण व तांत्रिक मार्गदर्शन, विंधणयंत्रे व इतर सयंत्राच्या दुरुस्ती देखभाली करीता मार्गदर्शन करणे, स्त्रोत बळकटीकरण करण्यासाठी पुनर्भरणाच्या पारंपारिक व अपारंपारिक उपाययोजना राबविणे व स्त्रोत विकसीत करण्याकरीता मार्गदर्शन करणे, भूजल गुणवत्तेचा अभ्यास करुन समायोजित शिफारसी करणे व सल्ला देणे याही कामाचा समावेश आहे.

उपभोक्त्यांठी पुरविण्यांत येणा-या सर्व सेवा जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयामार्फत पुरविण्यांत येतात.

१) सार्वजनिक पिण्याच्या पाण्यासाठी उद्‌भव विहिर/ विंधण विहिर सर्वेक्षण करणे.

२) सिंचन विहिरींच्या अर्थसहाय्यीत बँक प्रकरणांसाठी सर्वेक्षण करणे.

३) स्थानिक स्तरावर भूजल सर्वेक्षण.

४) आदिवासी शेतक-यांना वीज पुरवठयासाठी भूजल उपलब्धतेचे प्रमाणीकरण.

५) उपसा जलसिंचन योजनांसाठी सर्वेक्षण व प्रमाणीकरण.

६) जीवनधारा, जवाहर योजना प्रकरणे.

७) जवाहर ग्राम समृध्दी योजना, प्रकरणे.

८) भूमीगत बंधारे प्रकरणे.

९) पाझरतलाव प्रकरणे.

१०) संपुर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत पाणी पुरवठा विहिरींचे सर्वेक्षण.

११) महाराष्ट्र भूजल अधिनियम १९९३ अंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त होणा-या प्रकरणांचे सर्वेक्षण करणे व तांत्रिक सल्ला देणे.

१२) जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त वाळू उत्खन्न प्रकरणांचे सर्वेक्षण करणे.

१३) भूभौतिक प्रकरणांचे सर्वेक्षण करणे.

१४) अयशस्वी सिंचन विहिरींना अनुदान देणे.

१५) खाजगीरित्या पाण्याचे रासायनिक व जैविक पृथ:करण करुन देणे.

१६) भूजल उपभोक्ता गटास आवश्यक शासकीय शुल्क प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविणे.

१७) उपलब्ध पिण्याच्या पाण्याच्या कमी क्षमतेच्या विंधण विहिरींचे जलभंजन करुन पाणी क्षमता वाढविणे.

भूजल सर्वेक्षण करणेकरीता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे ३३ जिल्हयांमध्ये वरिष्ठ भूवैज्ञानिक यांची कार्यालये कार्यरत आहेत. तसेच ६ महसूली प्रादेशिक विभाग स्तरावर उपसंचालकांची ६ कार्यालये कार्यरत आहेत. संचालनालयामार्फत उपरोक्त नमूद केलेल्या कामांचे सनियंत्रण व पर्यवेक्षण केले जाते. संचालनालय स्तरावरील प्रकरणांशी जबाबदार असलेल्या कर्मचारी अधिकारी इत्यादी बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | उपभोक्ता गटास आवश्यक भूजलानुषंगीक सर्व माहिती पुरविणे. | वरिष्ठ भूवैज्ञानिक (जलविज्ञान प्रकल्प) | ३० दिवस | उपसंचालक,(जविप्र) उपसंचालक (संविक) |
| २ | दरवर्षी निरिक्षण विहिरींच्या पाणी पातळींच्या नोंदीच्या अभ्यासावरुन संभाव्य पाणी टंचाई अहवाल तयार करुन प्रसिध्द करणे. | वरिष्ठ भूवैज्ञानिक (सर्वेक्षण) | दरवर्षी नोव्हेंबर, फेब्रुवारी, एप्रिल व जून पहिल्या आठवडयात | सहसंचालक (१) भूसविय़ं.पुणे |
| ३ | शासन सेवेत गट-क व ड या संवर्गात नव्याने नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/ कर्मचा-यांचे बाबत भरती प्रक्रियेची कार्यवाही करणे, तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या अ, ब संवर्गातील अधिका-यांच्या भरती प्रक्रियेबाबत कार्यवाहीबाबत शासनास अवगत करुन देणे. | प्रशासन अधिकारी | शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार | मा.संचालक, भू.स.वि.यं.पुणे |
| ४ | केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ अंतर्गत सुविधाबाबत. | जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी | शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार | अपिलिय अधिकारी तथा अति. संचालक |
| ५ | जनतेच्या सर्वसामान्य तक्रारी दाखल झाल्यास करण्यात येत असलेली सुविधा. | प्रशासन अधिकारी | शासनाने ठरवून दिलेलया नियमानुसार | मा.संचालक भू.स.वि.यं.पुणे |

१. जिल्हा परिषद स्थित विंधन यंत्राच्या रुपये ५,०००/- पेक्षा जास्तीच्या खर्चाकरता २२१५ १८८१ लेखाशिर्षाअंतर्गत अनुदान मागणी आणि वितरणाचे नियोजन, दुरुस्तीबाबत मार्गदर्शन करणे.

२. विंधन विहिर खुदाई आणि तद्नुषंगिक बाबींची दर निश्चिती करणे व सर्व जिल्हा परिषदांना अवगत करुन देणे.

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | यंत्रसामुग्रीचे निर्लेखन व लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे. | वरिष्ठ खोदन अभियंता | नियोजनात्मक कामे असल्यामुळे तातडीने पार पाडण्यात येतात. त्यामुळे याला कार्यकृतीचा कालावधी लागू नाही. | मा.सहसंचालक (अभियांत्रिकी) |
| २. | विंधणयंत्रे कामासाठी भाडयाने लावणे करिता दर विश्लेषण करणे व जिल्हा परिषदेला विंधणयंत्रे लावण्याबाबत मार्गदर्शन करणे. | वरिष्ठ खोदन अभियंता (मु.) | नियोजनात्मक कामे असल्यामुळे तातडीने पार पाडण्यात येतात. त्यामुळे याला कार्यकृतीचा कालावधी लागू नाही. | मा.सहसंचालक (अभियांत्रिकी) |